## वागळे वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २२२ /२०२४ दि. २८/१०/२०२४

### –:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील वागळे वाहतुक उपविभागाचे हददीत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने दिनांक २८/१०/२०२४ रोजी सकाळी०७:०० वा ते १९:००वा पर्यत महायुतीने उमेदवार हे अर्ज भरणार असुन त्यांची परबवाडी शिवसेना शाखा वागळे जागृती क्रिडा मैदान येथुन प्रचार फेरी निघणार आहे. सदर प्रचार फेरी ही परबवाडी–मेन्टल हॉस्पीटल येथुन मिरवणुक निघून ती आय.टी.आय.कॉलेज कैलासनगर,श्रीनगर,ठाणे प. येथे जाणार असुन, सदर ठिकणी उमेदवार व कार्यकर्ते व इतर जनसमुदाय मोठया संख्येने हजर राहणार आहेत. सदर मिरवणुक मार्गावर व परीसरात वाहतुक कोंडी होवू नये व वाहतुक सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे.

| | |
|---|---|
| **No Parking** | तिनहात नाका ते मॉडेला चेक नाका, मॉडेला चेक नाका ते रोड नं.१६, रोड नं.१६ ते २२ नंबर सर्कल, २२ नंबर सर्कल ते धर्मवीर चौक पर्यत येणाऱ्या जाणाऱ्या रोडवर दोन्ही बाजुस नो पार्किंग करण्यात येत आहे. |

सदरची अधिसुचना दिनांक २८/१०/२०२४ रोजी सकाळी ०७:०० वा ते १९:००वा. पर्यत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही फायरब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

–जिल्हाधिकारी, ठाणे
–आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
–अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
–प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
–पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५, ठाणे.
–पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
–परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.
–विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
–नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
–ठाणे पोलीस पत्रक

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

स.पो.आ. वागळे वाहतूक विभाग,/पोनि वागळे वाहतूक उपविभाग.

CamScanner